**2.5.4: Teachers put-forth efforts to keep themselves updated professionally through**

- In house discussions on current developments and issues in education
- Sharing information with colleagues and with other institutions on policies and regulations

**NEP – 2020 Workshop Organized with Sister Institutions (Online mode)**



रयतेचा वाली
डिजिटल शैक्षणिक दैनिक

डिजिटल शैक्षणिक दै. रयतेचा वाली (श्री. शाहू संभाजी भास्ती - ११७५७३८३२१) वर्ष पहिले अंक २३७ बुधवार दिनांक १७ जून २०२० पान १४

## आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाच्या मार्गदर्शनपर वेबिनारचे उद्घाटन

### बी.एड्. सी.ई.टी. करण्यासाठी ईच्छुक विद्यार्थ्यांसाठी खास सत्राचे आयोजन

धुळे : दि. १६ (रयतेचा वाली, प्रतिनिधी-श्री.अविनाश पाटील) शिक्षणातील पदवी संपादन केल्यानंतर पुढे काय करायचे. हा प्रश्न उपस्थित होतो. आणि खरे शिक्षण हे कॉलेज शिक्षण संपल्यानंतर सुरू होते याची प्रचिती विद्यार्थ्यांना येऊ लागते.

सध्या कोरोनाचा प्रादुर्भाव दिवसेंदिवस वाढत आहे. त्याच पार्श्वभूमीवर आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाच्या बापूसाहेब डी डी विसपुते शिक्षणशास्त्र महाविद्यालयाने बी.एड. करण्यासाठी ईच्छूक असलेल्या विद्यार्थ्यांसाठी, त्या विद्यार्थ्यांच्या शंकाचे निरसन करण्यासाठी तीन दिवसीय वेबीनारचे आयोजन केले आहे.

बी.एड करायचे आहे, मग सी.ई.टी परीक्षेची तयारी कशी करायची !!! सर्वत्र कोरोना विषाणूमुळे लॉकडाऊन सुरू आहे. विद्यार्थ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, अशा या लॉकडाऊनच्या काळात आमच्या महाविद्यालयाने १६ जून ते १८ जून २०२० या तीन दिवसांच्या काळात एकुण सहा सत्रात B.Ed C.E.T Guidance चे नियोजन करण्यात आलेले आहे. आज दि. १६ जून रोजी सकाळी ११:०० वाजता या वेबिनारचे उद्घाटन समारंभ संपन्न झाला.

या कार्यक्रमासाठी आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा.नानासाहेब महेंद्रजी विसपूते संस्थेच्या सचिव सौ.स्मिता विसपूते, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. मिनाक्षी महाले, मॉन्टेसरी विभागाचे प्रमुख श्री.राजेंद्र गवळी सर,सर्व स्टाफ व विद्यार्थी उपस्थित होते.

Minakshi Mahale | Pro. Vaishali Sali | Deepak Chaudhari
Sarika Badgujar | Mahendra Vispute | Yogita Bari

प्रा.सारिका बडगुजर यांनी ईशस्तवाने कार्यक्रमाची सुरुवात केली, सुत्रसंचालन ,सर्वांचा परिचय प्रा.डॉ योगिता बारी यांनी केला, प्रास्ताविक महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. मिनाक्षी महाले यांनी केले,त्यानंतर महाविद्यालयाने गेल्या वर्षभरात जे विविध उपक्रम घेतले जातात, त्यांची व्हीडीओ प्राचार्य डॉ. मिनाक्षी महाले यांनी सादर केली. त्यानंतर प्रा.दिपक चौधरी यांनी त्यांचे मनोगत मांडले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.नानासाहेब महेंद्रजी विसपूते यांनी सध्याच्या कोरोना विषाणूमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे अनेक समस्यांना आपल्याला सामोरे जावे लागत आहे, आजच्या या ऑनलाइन वेबिनारच्या माध्यमातून आपल्याला जास्त फायदा हा बी.एड् सी.ई.टी साठी नक्कीच होणार आहे, त्यांचे संपूर्ण मार्गदर्शन आपल्याला पुढील तीन दिवसात मिळणार आहे, अशा शब्दात मार्गदर्शन केले. सौ.स्मिता विसपूते मॅडम यांनी आजच्या वेबिनारसाठी शुभेच्छा दिल्या, प्रा.वैशाली साळी यांनी उपस्थित सर्वांचे मनापासून आभार मानले. यानंतर लगेच महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.मिनाक्षी महाले यांनी दुसऱ्या सत्रात बी.एड् सी.ई.टी व ई.एल.सी.टी. संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या शंकाचे निरसन करण्यात आले. टिप:- सदर वेबिनार पुढील दोन दिवस सुरु आहे.... तरी विद्यार्थ्यांनी त्यांचा लाभ घ्यावा....

Bapusaheb D.D.Vispute College of Education (B.Ed) Walwadi Tal.Dist.Dhule ★ NCTE Code APWO 4336 ...

Principal
Adarsh Shikshan Prasarak Mandal's
Bapusaheb D.D.Vispute College of Education, Walwadi Tal.Dist.Dhule